# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १३/०३/२०२५ (गुरूवार) संध्याकाळ**

---

## अवैध सुगंधीत तंबाखुची वाहतुक करणाऱ्या आरोपीवर गुन्हा नोंद
## किंमती १०,४५,११० रूपयांचा मुददेमाल जप्त ,केळवद पोलीसांची कारवाई

पोलीस स्टेशन केळवद :— दिनांक १२/०३/२०२५ रोजी मौजा छत्रापुर फाट्यावर केळवद पोलीस नाकाबंदी दरम्यान वाहने चेक करीत असतांना एका काळया रंगाची कार पांढुर्णा ते नागपुर कडे येत असताना दिसली. पोलीसांना पाहुन सदर कार चालकाने त्याची कार सावळी फाटयावरून सावळी गावाकडे जाणा—या रोडने नेली. पोलीसांना त्या वाहनावर संशय आल्याने त्यांनी सदर वाहनाचा पाठलाग करून काळया रंगाचे वाहन क्रमांक एम. एच. ०२ सी. पी. ८४८३ महीन्द्रा एक्स यू व्ही ५०० ला गाठुन वाहनाचे चालकास त्याचे नाव पत्ता विचारले असता त्याचे नाव अब्दुल कादीर अब्दुल वाहीद अन्सारी, वय—२८ वर्षे, रा. आटोमोटीव्ह चौक, कामठी रोड, नागपुर, जि. नागपुर, असे असल्याची माहीती प्राप्त झाली. पोलीसांनी वाहनांची तपासणी केली असता सदर वाहनात शासनकडुन प्रतिबंधीत असलेल्या सुगंधीत तंबाखुची वाहतुक होत असल्याचे दिसुन आले. नमुद वाहनातुन १) पानमसाला विमल २) सुगंधित तंबाखु (व्ही—१ ), ३)सुगंधित तंबाखु (जनम १३५), ४) सुगंधित तंबाखु (गोल्डन सफारी),५) सुगंधित तंबाखु (रीमझिम), ६) पानमसाला (राजश्री ), ७) सुगंधित तंबाखु (ब्लॅक लेबल—१८), ८) सुगंधित तंबाखु (डबल ब्लॅक—१८), ९) सुगंधित तंबाखु (सागर शक्ती) असा एकुण अंदाजे १३०.८४२ किलोग्रॅम साठा, किंमती १,४५,११०/— रूपये आणि वाहन क्रमांक एम एच ०२ सी पी ८४८३ महीन्द्रा एक्स यू व्ही ५०० **किंमती ९,००,०००/— रू असा, एकुण १०,४५,११० /— रूपये** मुद्देमाल आरोपीचे ताब्यातुन जप्त करण्यात आले आहे.

आरोपी विरूध्द आरोपीविरूद्ध कलम १२३, २७४, २७५, २२३ भान्यास सह कलम  अन्न सुरक्षा माणके अधिनियम अन्वये गुन्हा नोंद केला आहे.

## नागपुर जिल्हयातुन रेकॉर्ड वरील गुन्हेगार श्याम नारायण अल्लाडीवार याला केले हद्दपार

महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५६ अन्वये उपविभागिय दंडाधिकारी, सावनेर यांनी शाम नारायण अल्लाडीवार ,वय ३८ वर्षे, वार्ड क्र ५, केळवद ,ता. सावनेर ,जि नागपुर याला हद्दपार केले

नमुद आरोपीवर  अनाधिकृत घरात प्रवेश करून धमकावने,दुखापत करून नुकसान करणे, अवैध रित्या दारू विक्री करणे असे गुन्हे दाखल असुन त्याचे गुन्हेगारी कृत्यांवर नियंत्रण ठेवण्याकरीता वेळोवेळी पोलीसांनी त्याचेवर प्रतिबंधक कार्यवाही सुध्दा केली आहे.परंतु  आरोपी याने आपली गुन्हेगारी गतिविधी निरंतर सुरूच ठेवली. सदर आरोपी असे गुन्हे करण्याच्या सवईचा असल्याने तो अशा प्रकारचे गुन्हे करून सामान्य जनतेच्या मनात दहशत पसरवितो तसेच याच्या कृत्यामुळे  शांततेचा भंग होवुन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची दाट शक्यता असल्यामुळे सदर आरोपींचा महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५६ (१) (ब) अन्वये हद्दपार करण्याचा प्रस्ताव पोलीसांनी उपविभागिय दंडाधिकारी  सावनेर यांचे कडे पाठविला असता त्यांनी प्रस्ताव मंजुरी करून

आरोपी नामे शाम नारायण अल्लाडीवार ,वय ३८ वर्षे, वार्ड क्र ५ केळवद ,ता. सावनेर ,जि नागपुर याला २ महीन्या करीता नागपुर शहर आणि नागपुर ग्रामीण येथुन हद्दपार केले आहे.



**आरोपी शाम नारायण अल्लाडीवार**

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर